महा मेट्रो

PUNE METRO

# महामेट्रो तर्फे उभारण्यात आलेल्या माहिती केंद्राला नागरिकांचा वाढता प्रतिसाद




पुणे , १३ ऑगस्ट २०१९ : पुणे मेट्रोचे ३३% काम पूर्ण झाले असून कामासंबंधी माहिती पुणेकर नागरिकांना पोहचवण्यासाठी महामेट्रोतर्फे विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. या उपाययोजनांचा एक भाग म्हणून महामेट्रोने कोथरूड , बालगंधर्व रंगमंदिर , व बंडगार्डन येथे सहयोग / माहिती केंद्र उभारण्यात आले आहेत. ही माहितीकेंद्र सकाळी ८ ते रात्री ११ वाजेपर्यंत उघडी ठेवण्यात आली असून त्यामध्ये महामेट्रो कर्मचाऱ्यांमार्फत मेट्रो संबधी संपूर्ण माहिती देण्यात येत असून नागरिकांच्या शंकाचे निरसन करण्यात येते. याव्यतिरिक्त या माहिती /सहयोग केंद्रात नागरिकांच्या सूचना, तक्रारी यादेखील नोंदवून घेण्यात येत आहेत व संबंधीत अधिकारी यांना त्याविषयी माहिती देऊन कळविण्यात येत आहे. मेट्रोची विविध माहिती पुस्तिका , दृक श्राव्य माध्यम, व्हिडिओ क्लिप्स इत्यादी अनेक माध्यमांद्वारे मेट्रो संबधी अद्ययावत माहिती या माहिती केंद्रात उपलब्ध आहे.

बालगंधर्व रंग मंदिर येथे पुणे मेट्रोच्या कोचच्या आकारासारखे माहिती केंद्र बनविण्यात आले आहे त्यामुळे तेथे भेट देणाऱ्या नागरिकांना पुणे मेट्रोचे कोच कसा असेल व त्यात काय सुविधा असतील, यासंबंधी माहिती मिळते. बालगंधर्व येथील माहिती केंद्र तरुणाई मध्ये अत्यंत लोकप्रिय असून सेल्फी घेण्यासाठी विद्यार्थ्यांची झुंबड बघण्यास मिळते. हे माहिती केंद्र सुरु झाल्यापासून १ लाख २० हजार नागरिकांनी या

ठिकाणी भेट दिली आहे. साधारणता: एका महिन्यात अंदाजित १०००० नागरिक माहिती केंद्राला भेट देत असतात. भेट देणाऱ्यामंध्ये महाविद्यालयीन तरुण व ५०-६० वयोगटातील लोकांची संख्या अधिक आहे. बालगंधर्व माहिती केंद्रात प्राथमिक शाळेचे विध्यार्थी सहलीं म्हणून देखील भेट देणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. जवळपास पुण्यातील सर्वच प्राथमिक शाळांनी या माहिती केंद्राला भेट दिली आहे. तसेच बंडगार्डन येथील केंद्राला २५० नागरिकांनी व कोथरूड येथील केंद्राला २००० नागरिकांनी भेट दिली आहे.



महामेट्रोने आनंदनगर, बालगंधर्व, व बंडगार्डन येथील माहिती केंद्र/ सहयोग केंद्र मध्ये अत्यंत प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे त्यामुळे माहिती केंद्राला भेट देणाऱ्या नागरिकांना अद्ययावत माहिती मिळत आहे. या माहिती केंद्रात आलेल्या सूचनांमध्ये मेट्रोचे काम कधी पूर्ण होईल , संपूर्ण मेट्रो भुयारी मेट्रो का नाही , स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गाची सुरवात कधी होईल ,रामवाडी ते वाघोली या मेट्रो मार्गाची सुरवात कधी होईल, सिंहगड रोडवर मेट्रो होणार का , नाशिक फाटा ते चाकण मेट्रो का नाही करत , इत्यादी. अनेक प्रश्न, सूचना नागरिकांमार्फत आलेल्या आहेत. याव्यतिरिक्त मेट्रो स्टेशनचे सरकते जिने, लिफ्ट, एस्केलेटर यांच्या जगासंबंधी सूचना महामेट्रोला नागरिकांमार्फत मिळाल्या आहेत. या सूचनांमुळे पुणे मेट्रोला लोकउपयोगी बनविण्यात फायदा होत आहे. पुणे मेट्रो तर्फे माहिती केंद्र, सहयोग केंद्राबरोबरच शहराच्या विविध भागात संवाद, सेमिनार, भाषणे इत्यादींचे आयोजन करण्यात येत असून त्याद्वारे नागरिकांपर्यंत पोहचण्यास मेट्रोला मदत होत आहे. संवादामार्फत पुणेकरांचे सूचना, तक्रारी मेट्रोला कळत असून मेट्रो जास्तीत जास्त लोकाभिमुख बनविण्याचा मेट्रोचा प्रयत्न आहे.